पाक्षिक | शेतकरी संघटक | वर्ष ११ वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | अंक ८ वा
किंमत १ रुपया २५ पैसे | २१ ऑगस्ट १९९४

# गोदामे रिकामी करण्यासाठी, रिकामी पोटे भरणारा स्वातंत्र्यदिन १९९४

अजून एक स्वातंत्र्यदिन देशभरात साजरा झाला. रूढीप्रमाणे पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करून देशासमोर भाषण केले.

आपल्या भाषणात त्यांनी जम्मू-काश्मिर मधील परिस्थिती आणि देशात इतरत्रही पाकिस्तानच्या चिथावणीने सुरू असलेली दहशती कृत्ये यांबाबत पाकिस्तानवर खरपूस टीका केली आणि आम्ही हे खपवून घेणार नाही असे इशारेही दिले. देशभरच्या सर्वसामान्यांना आपल्यापुढील इतर दैनंदिन समस्यांचा क्षणकाल का होईना विसर पडायला हा विषय आणि तोही स्वातंत्र्यदिनासारख्या राष्ट्रीय सणाच्या दिवशी निश्चितच उपयुक्त होय.

मग हळूहळू अल्पसंख्याकांसाठी वित्त व विकास महामंडळाची ५००कोटी रुपयांच्या भांडवलावर स्थापना, अल्पसंख्याकांसाठी शिक्षणसुविधा, गालिचेउद्योग व इतर धोकादायक उद्योगांतील बालकामगारांच्या मुक्ततेसाठी एक महत्त्वाकांक्षी योजना, ग्रामीण भागातील नगरां (कसब्या)च्या विकासासाठी आठशे कोटींची योजना इत्यादि कल्याणकारी कार्यक्रमांची घोषणा केली.

आर्थिक कार्यक्रमासंबंधी बोलतांना त्यांनी "आम्ही आमच्या आर्थिक सार्वभौमत्त्वाला कोणतीही बाधा आणू न देता अर्थव्यवस्थेच्या खुलीकरणाने देशाचा विकास साधू" असा विश्वास व्यक्त केला. आणि मग मधेच ते म्हणाले, " आम्ही (अर्थव्यवस्थेत) बदल करण्याचा प्रयत्न करीत आहोत, मात्र आम्ही आमच्या मूलभूत (?) धोरणांपासून मुळीसुद्धा ढळणार नाही' तरीही 'परदेशी गुंतवणूकदार मोठ्या विश्वासाने इंडियात गुंतवणूक करीत आहेत' असेही ते म्हणाले.

पंतप्रधानपदी आरूढ झाल्या झाल्या 'देशाला परकीय कर्जाच्या बोजाखालून सुखरूप वर आणण्यासाठी देशातील शेतकऱ्यांनी आता पुढे व्हावे आणि हे काम फक्त शेतकरीच करू शकतील, अन्य कोणी नाही' असे म्हणणाऱ्या पंतप्रधानांनी शेतीक्षेत्रासंबंधी आपल्या भाषणात काय म्हटले? काही नाही. फक्त धान्यासंबंधी ते म्हणाले की, 'बालक आणि विद्यार्थी' प्रमुखतः मागासलेल्या जाती जमातीतील यांच्यासाठी मोठ्या प्रमाणावर धान्याचे वितरण करण्याची योजना सरकारने आखली आहे.' कारण? या मुलांची पोटे रिकामी आहेत म्हणून? नव्हे. या योजनेमागील कारण स्वच्छपणे पंतप्रधानांनी राष्ट्रध्वजाला साक्षी ठेवून सांगितले आहे की, 'देशातील धान्याची गोदामे भरभरून वाहात आहे. नवीन हंगामात तयार झालेला (आणि शेतकऱ्यांची घरे रिकामी करून आणलेला) माल ठेवायला जागा असणार नाही. त्यामुळे गोदामांतील दहा ते पंधरा लाख टन गहू, जागा रिकामी करण्यासाठी, बाहेर काढण्याची योजना आखली आहे.' याच गव्हाने त्या मुलांची पोटे भरावयाची आहेत.

गेली वर्षानुवर्षे सरकारने शेतकऱ्यांची दरसाल सत्तरबहात्तर टक्क्यांनी (म्हणजे चालू काळात २४,००० कोटी रुपयांनी) लूट केली, त्याचा परिणाम म्हणून वर्षानुवर्षे त्याला कर्ज काढीत राहावे लागले, कर्ज फेडता न आल्याने ते पिढ्या न् पिढ्या उरावर वागवीत राहावे लागले, सरकारची गोदामे भरता भरता पोरांची पोटे रिकामी ठेवावी लागली, घरच्या लक्ष्मीला आणि तिच्या लेकी-सुनांना चिरगुटांनी झाकावे लागले. गॅटसमोर सरकारने जे आकडेवारीसहित कबूल केले त्याबद्दल साधी खंतसुद्धा पंतप्रधानांनी या स्वातंत्र्यदिनी व्यक्त केली नाही. मग, खुल्या व्यवस्थेचा शेतकऱ्यांना फायदा मिळेल अशा धोरणांचा विचार मांडण्याची अपेक्षा करणे शुद्ध वेडेपणाचेच ठरेल.

●●●

# महाराष्ट्र शासनाचे कुचकामी महिला धोरण

**– सौ. शैलजा देशपांडे, छोटी आर्वी**

यावर्षी शासनाने महिला संबंधी नवीन धोरण जाहिर केले. हे धोरण म्हणजे महिलांना खोटी सहानुभूती दाखविण्याचा केलेला एक केविलवाणा प्रयत्न म्हणावा लागेल. ''महाराष्ट्राच्या मातीला अभिनव कल्पनांची जाणीव करून देणाऱ्या महिलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न'' असे या धोरणाचे वर्णन प्रस्तावनेत केले आहे.

हे धोरण ठरविताना शहरी महिला संघटनांच्या कार्यकर्त्या, राजकारणातील सक्रिय कार्यकर्त्यांचाच सहभाग. त्यामुळे शहरी स्त्रियांचे प्रश्न समोर ठेऊन त्यावरील उपाययोजना तयार केल्या गेल्या. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांची होणाऱ्या परवडीतून, त्यांच्या जाचातून मुक्तता असेही मत काही कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. स्त्रीप्रश्नावर जे काही चांगले उपाय सुचविले जातात ते सर्व गोळा करून जमा केलेले साहित्य म्हणजे हे महिला धोरण.

यात ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न, त्यांना रोज सोसावा लागणारा वनवास – ज्याची कल्पनाही करू शकणार नाही – यातून बाहेर पडण्याचा मार्ग नाही. करू, प्रयत्न केला जाईल अशा भाषेत महाराष्ट्र शासनाचे धोरण जाहिर झाले. सर्वच आघाड्यांवर अयशस्वी ठरलेले सरकार आता स्त्री प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यायला सरसावले आहे. राजकारणाच्या गदारोळात स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी महिला प्रश्न राजकारणाच्या पटावर खेळलेली एक खेळी आहे. कल्याणकारी योजना राबवून विकास साधण्याची कल्पना चांगली, पण प्रत्यक्षात विकास किती साधला जाईल हे कोडेच आहे.

या उलट, शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमांतून स्त्रीप्रश्नावर सांगोपांग चर्चा झाली, त्यावर उपाययोजना आखल्या गेल्या. त्यांची अंमलबजावणीपण झाली. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकरी स्त्री तिच्या आर्थिक प्रश्नासाठी घराबाहेर पडली. तिच्या संसाराला सांजी न येण्याचे वर्षानुवर्षे न सुटलेले कोडे तिला गवसले. शेतीमालाच्या एक कलमी कार्यक्रमात ते सुटले. प्रत्येक आंदोलनात घरच्या पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून लढण्यास सतत तिचे पाऊल पुढे पुढे पडले. स्त्रियांच्या मेहनतीवर व कष्टावर शेती प्रामुख्याने आधारलेली आहे. शेतीत सर्वात जास्त कष्टाची कामे स्त्रियाच करतात. कुटुंब आणि शेती दोन्ही आघाड्या ती सांभाळते. स्त्रीच्या घामावर ही जमीन कसली जाते. स्वतःचे दुःख हसत झेलणाऱ्या शेतकरी स्त्रीच्या प्रश्नांचा विचार मात्र कुणीच केला नाही. उलट त्याग, करूणा, ममता यांची बिरूदे लावून देव्हाऱ्यात बसविली.

घरात शेतीमालाच्या भावातून पैसा आला तरी तो स्त्रीपर्यंत पोहचून, त्याचा लाभ तिला मळेल कां? याउलट, येणाऱ्या पैशामुळे तिच्या दुःखात अधिकच भर पडेल हा विचार अनेक स्त्रियांनी बोलून दाखविला. यावर विस्तृत अशी चर्चा चांदवडच्या महिला अधिवेशनात झाली. त्यात प्रामुख्याने रोजगार हमी, पाणी, शिक्षण, हुंडा, पोटगी, समान नागरी कायदा आणि समाजातील असुरक्षितता यांवर सखोल चर्चा झाली आणि उपाययोजना अंमलात आणण्यासाठी ठराव केले गेले.

महिला धोरणाचे उद्दिष्ट व उपाययोजना चांगल्या दिसल्या तरी त्यांचा लाभ गरजू स्त्रियांपर्यंत किती पोहचणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हे प्रश्न स्वयंसेवी महिलांच्या प्रयत्नाने सुटतील. कारण, कायद्याने हे प्रश्न सुटू शकत नाही.

चांदवडच्या अधिवेशनातील ठरावाच्या आधारे स्त्रीप्रश्नाची जाण पुरुष कार्यकर्त्यांना होऊन त्यांनाही मनोमन अपराध्यासारखे वाटायला लागले व खऱ्या अर्थाने पुरूषही आपल्या परंपरागत विचाराच्या विळख्यातून बाहेर पडू लागले व त्यांच्या सहवासातील स्त्रिया खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ लागल्या. अमरावती अधिवेशनातील ठराव समोर ठेऊन त्यानुसार अंमलबजावणी करण्यास स्त्रिया समोर झाल्या.

**दुष्काळ** - दुष्काळ पडला तर ग्रामीण भागातील स्त्रीला रोजगार हमीच्या कामावर जावे लागते. कारण एक वर्षाचा दुष्काळ सोसण्याची आर्थिक क्षमता त्यांच्यात नसते. खडी फोडायला जावे लागते व ग्रामीण भागावर दुष्काळाचे संकट सतत येते. धोरणात त्यावर उपायोजना नाही. स्त्रियांसाठी स्वयंरोजगार अंतर्गत प्रक्रिया केंद्रे, सूत कातणे, इत्यादी उपाययोजना नाही.

सरकारी धोरणात रोजगार विषयाअंतर्गत स्त्रीची सरकारी, निमसरकारी नोकरी, त्यातील कायद्याची शिथिलता, तिला मिळणाऱ्या सोयीसवलती, वेतन वाढ यांचा विचार आहे. तिच्यावर येणाऱ्या नैसर्गिक व सामाजिक कारणाने त्यात अडथळा निर्माण झाला तर त्याच्या बदली प्रशिक्षित महिलांना नोकर भरती, पेन्शन, पाळणाघरे, स्वच्छतागृहे, दीर्घमुदतीची रजा अशा सोयी आहेत. यांचा शेतीत राबणाऱ्या स्त्रियांना काहीही लाभ नाही. शेतीमालाचे भाव ठरविताना महिलांनी शेतीसाठी केलेल्या घरगुती कामाचे ताससुद्धा विचारात घेण्यात यावे व कामगार कल्याण योजनांचा लाभही तिला मिळावा.

**पाणी व रस्ते** - ग्रामीण भागातील सर्वात मोठी समस्या पाणी व रस्ते ही आहे. २-३ किलोमिटर चालत जाऊन पाणी आणावे लागते. डोक्यावर दोन गुंड व चढण चढताना होणारा त्रास ही समस्या थोड्याफार फरकाने प्रत्येक गावात आहे. ही सत्य परिस्थिती असताना यावर उपाययोजना नाही. गावाला हापशी दिली जाते. विहिरीचे पाणी हाताने काढणे किंवा हापशीने काढणे हे सारख्याच कष्टाचे काम आहे. त्याऐवजी नळयोजना देण्यात यावी.

तसेच, रस्ते. पावसाळ्यात कित्येक

खेड्यांचा शहराशी संपर्क नसतो. पुराच्या पाण्याने गाव वेढले जाते त्यावेळी एखादी बाई आजारी असेल किंवा बाळंतपणात अडली असेल तर वैद्यकीय मदत मिळत नाही. त्याअभावी कित्येकवेळा बाईला जीव गमवावा लागतो.

परंतु शासनाच्या धोरणात वीज, रस्ते, पाणी यावरील उपाययोजना नाही. कारण त्याचे गांभीर्य शहरातील स्त्रीला कळतच नाही.

**मालमत्ता अधिकार -** या देशातील स्त्रीला समान नागरी कायद्याचा लाभ मिळत नाही. कारण स्त्रियांच्या बाबतीत हा कायदा कागदोपत्रीच रहातो. शहाबानो प्रकरणासारखे प्रकरण स्त्रीला न्याय देऊ शकत नाही. असहाय्य स्त्रियांसाठी निवारा केंद्रे उभारण्याची शासनाची योजना शहरापुरतीच आहे. 'माहेर योजना' सारखी चांगली दिसणारी योजना, पण ग्रामीण भागात त्यांची माहितीही नाही. त्यामुळे प्रत्यक्ष लाभापासून त्या वंचित होतात. ही योजना शहरातच आहे. तिच्या मालमत्तेच्या हक्कासंबंधी स्पष्ट भूमिका शासनाच्या धोरणात नाही.

या उलट, संघटनेमार्फत यावरील उपाय म्हणून 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आला. यात स्त्रीच्या कष्टाची जाणीव ठेऊन व तिला सन्मानाने जगण्याचा हक्क आहे ही जाणीव ठेऊन घरच्या लक्ष्मीच्या नांवे शेतातील कमीत कमी २-३ एकर जमीन देण्यात आली व तिला इतर नागरिकाप्रमाणे सन्मानाने जगण्याचा अधिकार देण्यात आला.

**आरोग्य** - आरोग्याविषयी धोरण खेडे - विभागासाठी राबविताना स्त्रीला आर्थिक मदत दिली जाणार आहे. सकस आहार व आपले कुटुंब मर्यादित ठेवण्यासाठी तिला प्रशिक्षण दिले जाणार आहे. ग्रामीण स्त्रीची आर्थिक ताकद वाढविण्यावर भर देण्यापेक्षा दरमहा २५ रु. मदत तिच्या नांवे जमा केली जाईल. या आर्थिक उपकाराच्या योजनेने ग्रामीण स्त्रीच्या मातृत्वाची चेष्टाच केली गेली आहे. परंतु हे सर्व धोरण कागदावरच राहील. अशा योजनांचा लाभ स्त्रियांना मिळत नाही. किरकोळ दुखणी अंगावरच काढली जातात. दुखणे जास्त झाल्यावर तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी नेले जाते. तेव्हा आरोग्याचे धोरण केवळ कागदावर न रहाता तातडीची उपाययोजना म्हणून आरोग्यसेवा खेड्यात उपलब्ध करू द्यायला पाहिजे.

**शिक्षण -** जे आरोग्याचे तेच शिक्षणाचे साक्षरता मोहिमेवर लाखो रुपये खर्च झाले तरीही साक्षरता मोहिम प्रत्यक्षात कागदावरच राहिली. कारण शासनाची कामचुकार नोकरशाही. खेड्यात एकशिक्षकी शाळा, तीही ४ थी पर्यंत हे प्रमुख वैशिष्ट्य. तसेच आर्थिक अडथळे यामुळे मुलीचे शिक्षण अर्धवट रहाते. कारण मुलीपेक्षा मुलाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. तसेच आईला शेतीच्या व घरकामात मदत म्हणून, पाठचे भावंड सांभाळण्यासाठी म्हणून मुलीच्या शिक्षणावर गदा येते. तसेच बाहेरगांवी जाण्यायेण्यातील असुरक्षितता. याकरिता सातव्या वर्गापर्यंत गावातच शिक्षणाची व्यवस्था करावी किंवा पत्राद्वारे शिक्षण, दूरदर्शनवरील शिक्षणावरील कार्यक्रम दाखवावे ह्या उपाययोजना संघटनेने ठरावामार्फत सुचविल्या.

**असुरक्षितता -** आज समाजात सर्वत्र असुरक्षितता पसरली आहे. गुंड व पुढाऱ्यांनी दारूचे दुकान, सोसायट्या, पतसंस्था याद्वारे आपले अड्डे निर्माण केले. याला कारण एकतर ग्रामीण भागातील दारिद्र्य व शहरातील वाढती बेरोजगारी, झोपडपट्टी यामुळे दादा लोकांचे वर्चस्व. सतत दूरदर्शनसारख्या प्रभावी माध्यमातून दाखविले जाणारे भडक व अतिरंजित कार्यक्रम, यामुळे स्त्रीला एक उपभोगाची वस्तू म्हणून पाहण्याचा संकुचित दृष्टीकोन. जनतेचे रक्षक असणारे पोलिससुद्धा सध्या याला हातभार लावतात. त्यातच जळगांवसारखे लांछनास्पद वासनाकांड तयार होते. पुढाऱ्याच्या हस्तक्षेपाने स्त्रीवरील अत्याचाराची प्रकरणे दडपली जातात.

**दारूदुकान बंदी -** दारू दुकानात गुंडांचे महत्त्वाचे केंद्रस्थान आहे. दारूमुळे कित्येक संसार उध्वस्त झालेले दिसतात. ही दारूची कीड संसारातून नाहीशी करण्यासाठी महिलांनी दारू दुकानाला कुलूप लावणे, बाटल्या फोडणे असे कार्यक्रम हाती घेतले.

याउलट, शासनाने ग्रामसभेच्या ठरावानुसार ७५% महिलांची संमतीने ठराव झाल्यास दारू दुकान बंद करण्याची योजना आखली आहे. प्रत्यक्षात असा ठराव होऊनही दारूचे दुकान पुढाऱ्याच्या मर्जीने सुरूच राहतात. त्यावर शासनाने कडक उपाय योजून दारूची दुकाने बंद करावी. पण दुसरीकडे, मद्यावर अतिरिक्त कर लावून त्या उत्पन्नातून स्त्रिया व बालकांच्या विकासाची कामे हाती घेण्याची घोषणा शासनाने या धोरणात केली आहे.

तसेच, स्त्रियांवरील अत्याचारांची कडक चौकशी करून गुन्हेगाराला शासन करावे, स्त्रियांना स्वतंत्र व सुरक्षित जगता यावे यासाठी स्वतंत्र न्यायालयाद्वारे अशा प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी 'स्त्री संरक्षक अधिकारी' नेमावी असे चांदवडच्या ठरावात म्हटले आहे.

**जि. परिषद व पंचायत राज -** ही ग्रामीण भागातील सत्तास्थाने काबीज करण्याच्या दृष्टीने या निवडणुका लढविण्याचा निर्धार चांदवड अधिवेशनात केला गेला. गावातील सुधारणा, स्त्रियांचा प्रश्न सोडविण्यासाठी महिलांनी निवडणूक १००% लढवावी असे ठरले.

शासनाने या धोरणात निवडणुकीत ३०% राखीव जागा ठेऊन स्त्रियांची मागासलेल्या म्हणून अवहेलना केली आहे. एकीकडे स्त्रीला समान अधिकार देण्याचा, तिच्या सांस्कृतिक, सामाजिक, बौद्धिक विकासासाठी कटिबद्ध होण्याचा दावा करीत तिला मंडल आयोगाचे मागासवर्गीय लाभ मिळवून देऊन फार मोठे उपकार स्त्री वर्गावर करीत असल्याचे समाधान शासन मानीत आहे. तिला अशा सवलती जाहिर करण्यापेक्षा पुरूषाच्या बरोबरीने नोकरीच्या क्षेत्रात सामावून घ्यायला हवे होते.

निवडणुकीतील ३०% आरक्षण देऊन स्त्रीजातीवर खूप मोठे उपकार शासनाने केले असे दिसत असले तरी यात पुढाऱ्याच्या घरच्या महिलाच ३०% जागाचे प्रतिनिधीत्व करतील यात शंकाच नाही.

१००% जागा महिला लढवतील. आरक्षण नको असा ठराव औरंगाबाद अधिवेशनात करण्यात आली, कारण सर्वच

क्षेत्रात स्त्री ही पुरूषाच्या बरोबरीने भाग घेणार आहे.

हे महिला धोरण महिलांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास करण्याच्या दृष्टिने कुचकामी ठरणारे आहे. यात स्त्रीच्या बाबतीत आशावाद व्यक्त करण्यात आला आहे. त्यातून स्त्रियांबद्दलची खोटी सहानुभूती दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. धोरणे व उद्दिष्टे चांगली असली तरी शहरी स्त्रियांनाच त्याचा लाभ होणार आहे. या धोरणाची फळे सर्वसामान्य स्त्रीपर्यंत पोहचतील की पुढाऱ्यांच्या घरातील स्त्रीपर्यंतच मर्यादित राहतील ही शंका आहे. ग्रामीण भागात महिला धोरणाचे फक्त तुणतुणेच वाजणार. प्रत्यक्ष लाभ काहीच नाही.

वर्षानुवर्षाच्या अत्याचाराला, अन्यायाला बळी पडलेल्या स्त्रियांचे प्रश्न काही चुटकीसारखे सुटणारे नाही. शासनाच्या माध्यमातून तर मुळीच नाही. आजपर्यंत अनेक क्षेत्रातील, सरकारने आखलेली धोरणे व उपाययोजना यांचा अंमलबजावणीचा आढावा घेता हे कुचकामी धोरण आहे. शासन प्रत्येक आघाडीवर अयशस्वी ठरले आहे. आता सगळीकडून अयशस्वी झाल्यावर महिलांची सहानुभूती मिळविण्याचा एक शेवटचा केविलवाणा प्रयत्न आहे. कायद्याने कुठलाही प्रश्न सुटत नाही. स्वयंसेवी संघटना व महिला कार्यकर्त्या जोवर स्वतः प्रयत्न करणार नाही, तोपर्यंत स्त्रियांचे दुःख जाणून घेणे शक्य नाही.

याउलट, शेतकरी संघटनेने स्त्री प्रश्नाचा विचार जिव्हाळ्याने समजून उमजून घेतला. ठराव करून त्यावरील उपाययोजना अंमलात आणल्या. दारूदुकानबंदी, पाणी, रोजगार, स्त्रीचा मालमत्तेचा हक्क हे प्रश्न प्रत्यक्षात राबविले गेले. अनेक वर्षाच्या अत्याचाराने, दुःखाने होरपळून निघालेल्या स्त्रियांच्या जखमांवर फुंकर घातली गेली. तिला इतर नागरिकाप्रमाणे सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, हे पटवून दिले. स्त्रीला मन असते तसेच तीसुद्धा समाजाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब प्रमुख घटक ही प्रतिमा शेतकरी संघटनेच्या माध्यमाने समजासमोर आली.

पिढ्यान् पिढ्या पावलात अडकविलेल्या मणामणाच्या बेड्या शासनाच्या या तकलादू धोरणाने निखळणार तर नाहीच; अधिक गुंतागुंत होईल. तरीही स्त्री प्रश्नाची, तिच्यावरील अत्याचाराची सर्वत्र होणारी चर्चा त्यावर सहानुभूती दाखविण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेले महिला धोरण.

# कर्जमुक्ती ?
# कर्जाचा लेखाजोखा

'शासनाचे धोरण, शेतकऱ्याचे मरण' ही घोषणा शेतकरी संघटनेने पंधरा वर्षांपूर्वी दिली. पुढाऱ्यांनी, अर्थशास्त्रज्ञांनी त्याची कुचेष्टा केली. सरकार शेतकऱ्यांना प्रचंड मदत करते, सब्सिडी देते असा कांगावा संघटनेबाहेरील सर्वजण करीत होते.

संघटनेची भूमिका आता आकडेवारीने सिद्ध झाली. सरकारमान्य आकडेवारीने आता असे दाखवून दिले आहे की, सतरा प्रमुख शेतीमालांच्या खेरदीविक्री व्यवहारात सरकारने शेतकऱ्यांना २४,००० कोटी रुपयांचा घाटा एका वर्षात घातला. दरवर्षी सतरा शेतीमालांत चोवीस हजार कोटी रुपयांनी शेतकऱ्यांना बुडवलेल्या सरकारला शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीचा काय अधिकार? देशभरचे सारे शेतकऱ्याचे कर्ज दंड, व्याज जमा धरता फक्त १४,००० कोटी रुपयांचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने शेतकऱ्यांना बाराशे हजार कोटी रुपयांना बुडविले आणि चौदा हजार कोटी रुपयांच्या वसुलीकरता शेतकऱ्यांचा जीव ते हैराण करीत आहे.

हा हिशोब झाला देशाच्या पातळीवरचा. एकेका शेतकऱ्याच्या शेतावर हा हिशोब कसा काय बसतो, करण्यासारखा आहे. सर्व स्वातंत्र्योत्तर काळाचा हिशोब लावणे कठीण आहे. पण, गेल्या दहा वर्षांचा हिशोब थोड्या प्रयत्नाने करता येईल.

नागपूर येथे १० नोव्हेंबर १९९४ रोजी शेतकरी संघटनेचे अधिवेशन भरणार आहे. त्या निमित्ताने कर्जमुक्तीसाठी एक योजना आखण्यात आली आहे. आपण सरकारला किती देणे लागतो आणि सरकार आपल्याला किती देणे लागते याचा हिशोब ज्यांना समजून घ्यायचा असेल त्यांच्यासाठी ही योजना आहे. सोबत एक तक्त्याचा नमुना दिला आहे. त्या नमुन्यात दाखविलेली पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांनी गेल्या दहा वर्षात त्यांनी काढलेल्या उत्पादनाची वार्षिक सरासरी क्विंटलमध्ये नोंदवावयाची आहे.

नागपूर अधिवेशनाच्या प्रचाराकरिता होणाऱ्या सभांत आणि प्रचारयात्रेत संघटनेच्या कार्यकर्त्यांकडे ही माहिती ठराविक नमुन्यात द्यायची आहे.

ही माहिती गणकयंत्रात घालून शेतकरी संघटनेतर्फे प्रत्येक शेतकऱ्यास सरकार किती देणे लागते या संबंधी एक प्रमाणपत्र दिले जाईल. या प्रमाणपत्राचा नमुनाही सोबत दिला आहे.

शेतकऱ्यांमागे कर्जवसुलीसाठी तगादा लावणाऱ्या सोसायटी किंवा बँकेला उत्तर देताना, 'सरकारच मला इतके देणे लागते, त्यांच्याकडून वसुली करून घ्या' असे उत्तर ऐकायला मिळाले तर वसुली अधिकाऱ्यांची तोंडे मोठी पाहाण्यासारखी होतील.

अधिवेशनाच्या प्रचाराच्या काळात माहिती पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना नागपूर अधिवेशनात प्रमाणपत्रे देण्याची व्यवस्था होईल. अधिवेशनाच्या वेळी माहिती पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना अधिवेशनानंतर जिल्हा प्रमुखांमार्फत प्रमाणपत्रे पोहोचविण्यात येतील.

# कर्जाचा लेखाजोखा

## कर्जविषयक माहितीपत्रक

खातेदाराचे नाव : ____________________

पत्ता : ____________________

गाव : __________ पोष्ट : __________

ता. : __________ जि. : __________

**थकित कर्ज – १ जानेवारी १९९४ रोजी**

१. सोसायटी __________ रु.

२. भू-विकास बँक __________ रु.

३. राष्ट्रीकृत बँक __________ रु.

एकूण __________ रु.

**पिकाची वार्षिक सरासरी १९८४ ते १९९३**

| क्र. | पीक | वार्षिक सरासरी उत्पादन क्विंटलमध्ये |
|---|---|---|
| १. | तांदूळ | |
| २. | गहू | |
| ३. | मका | |
| ४. | तूर | |
| ५. | हरभरा | |
| ६. | उडीद | |
| ७. | मूग | |
| ८. | भुईमूग | |
| ९. | सोयाबीन | |
| १०. | कापूस | |
| ११. | राई व मोहरी | |
| १२. | ज्यूट (कच्चा) | |
| १३. | तंबाखू | |
| १४. | ऊस | |
| १५. | बाजरी | |
| १६. | ज्वारी | |
| १७. | बार्ली | |
| | | |
| | | |
| | | |

CERTIFICATE NO. : DATE :

*Certified that the Government of India**

*owes Shri./Smt. ____________________ of Village __________*

*Post __________ Taluka __________ Dist. __________ of Maharashtra a*

*Sum of Rs. __________ (____________________)*

*of Product-Specific Negative Subsidy during the period 1984-1993.*

**Shetkari Sanghatana**

** Accepted by Ministry of Commerce Vide List of Commitments Submitted to GATT Secretariate; March 1994.*

# नागपूर अधिवेशन १०, ११, १२ नोव्हेंबर १९९४
# शरद जोशी यांचा प्रशिक्षण दौरा

मुंबई येथे दि. ११/१२ ऑगस्ट १९९४ रोजी झालेल्या कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षण शिबिरामध्ये, नागपूर येथे १०/११/१२ नोव्हेंबर १९९४ ला होणाऱ्या शेतकरी संघटनेच्या सहाव्या अधिवेशनाच्या प्रचारकार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

प्रचाराच्या पहिल्या आघाडीतील कार्यकर्ते ठरल्याप्रमाणे २१ ऑगस्ट पासून जिल्ह्याजिह्यात प्राथमिक प्रचारकामासाठी दौऱ्यावर निघणार / निघाले आहेत. २० सप्टेंबर १९९४ पासून नागपूर अधिवेशनाच्या विषयपत्रिके संदर्भात श्री. शरद जोशींचा प्रशिक्षण दौरा सुरू होणार आहे. प्रचाराच्या पहिल्या आघाडीचे काम या दौऱ्याची पार्श्वभूमी तयार करणे हे आहे.

शरद जोशी आपल्या दौऱ्यातील एकेका दिवशी एकेका जिल्ह्यात असतील. त्या दिवशी सर्वसाधारणपणे

१. जिल्हा कार्यकर्ता बैठक
२. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मेळावा
३. व्यापारी संघटना किंवा चेंबर ऑफ कॉमर्सची बैठक
४. सर्व नागरिकांसाठी जाहिर सभा

असे चार कार्यक्रम प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी होतील. शरद जोशींच्या या प्रशिक्षण दौऱ्यात –

(अ) कर्जमुक्ती आंदोलन नव्या स्वरूपात.
(ब) भ्रष्टाचारविरोधी आंदोलन.
(क) आगामी निवडणुकीसाठी उमेदवार प्रस्ताव.
(ड) सरकारशाहीचा विरोध.

**शरद जोशींच्या यांचा नागपूर अधिवेशन प्रशिक्षण दौरा**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०/९/९४ | सोलापूर | ३०/९/९४ | (विश्रांती) | १०/१०/९४ | बुलढाणा |
| २१/९/९४ | उस्मानाबाद | १/१०/९४ | कोल्हापूर | ११/१०/९४ | अकोला |
| २२/९/९४ | लातूर | २/१०/९४ | सांगली | १२/१०/९४ | आमरावती |
| २३/९/९४ | बीड | ३/१०/९४ | सातारा | १३/१०/९४ | (विश्रांती) |
| २४/९/९४ | नांदेड | ४/१०/९४ | (विश्रांती) | १४/१०/९४ | यवतमाळ |
| २५/९/९४ | परभणी | ५/१०/९४ | (विश्रांती) | १५/१०/९४ | वर्धा |
| २६/९/९४ | जालना | ६/१०/९४ | नाशिक | १६/१०/९४ | चंद्रपूर |
| २७/९/९४ | औरंगाबाद | ७/१०/९४ | धुळे | १७/१०/९४ | गडचिरोली |
| २८/९/९४ | अहमदनगर | ८/१०/९४ | जळगाव | १८/१०/९४ | भंडारा |
| २९/९/९४ | (विश्रांती) | ९/१०/९४ | (विश्रांती) | १९/१०/९४ | नागपूर |

आता **शरद जोशींशी संपर्क**
०२१३५-५२२९५ या फोनवरही साधता येईल. ०२१३५-५२३५४ हा फोन फॅक्स व फोन म्हणून पूर्वीप्रमाणेच उपलब्ध आहे.

## शासनाचे महिला धोरण
# स्त्रीव्होटबँकेचे बीज भांडवल

**सौ. वृषाली विजय काटकर, वर्धा**

महाराष्ट्र शासनाने जून १९९४ मध्ये मोठा गाजावाजा करून जाहिर केलेले महिला धोरण अतिशयोक्ती आणि विसंगतींनी परिपूर्ण आहे.

जून १९९४ मध्ये महाराष्ट्र शासनाने महिला धोरणाची घोषणा केली असली तरी आतापर्यंत महिलांच्या विकासाच्या नावाने या शासनाने अनेक धोरणे आणि कार्यक्रम आखले होते. पण ते राबविण्याच्या बाबतीत शासनाला अपयशच आलेले आहे. आणि तरीही हे नवीन धोरण जाहिर होताच महिला वर्गामध्ये, विशेषतः शहरी महिलांमध्ये खूपच आनंदाचे वातावरण तयार झालेले दिसते. अर्थातच, वरवर पाहाता या धोरणामुळे आंनदी वातावरण बनणे साहजिकच आहे, कारण त्यातील कलमांमध्ये असेच पोकळ बुडबुडे तयार केलेले आहेत. या कलमांचा एकत्रित अभ्यास केल्यानंतर, शासनाचे हे धोरण राबविण्याबाबत प्रमाणिकता किती असेल याची शंका येते. कारण काही कलमांमध्ये विरोधाभास जाणवतो तर काही जास्तच अतिरंजित वाटतात. तसेच, काही कलमे तर राज्यशासनाच्या अखत्यारीतीलच नाहीत. त्यामुळे हे महिलाधोरण म्हणजे श्री. शरद पवारांचा निवडणूक जिंकण्यासाठीचा एक राजकीय डावपेच असावा असे वाटते.

उदाहरणार्थ, कलम ४.१ (३) मध्ये 'ग्रामसभेतील ७५% महिलांची मागणी असल्यास गावातील देशी दारुचे दुकान बंद करण्यात येईल.' असे लिहिले आहे.

आणि लगेचच्या कलम ४.२ मध्ये 'मद्यावर अतिरिक्त कर लादून त्यातून मिळणारे उत्पन्न स्त्रिया आणि मुले यांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमासाठी उपलब्ध केले जाईल.' असे लिहिले आहे.

आहे की नाही गंमत? ग्रामसभेतील महिलांच्या मागणीवरून दारू दुकान बंद झाले तर अतिरिक्त कर कशावर लादणार? मग कल्याणासाठी उत्पन्न कसे मिळणार? का ज्या गावातील बिचाऱ्या महिला ठराव करू शकणार नाहीत त्या गावातील चालू राहिलेल्या दुकानातील दारूवरील अतिरिक्त कराच्या उत्पन्नातून त्या महिलांचे किंवा इतर महिलांचे कल्याण करणार?

मुळातच, दारूमुळे महिलांचे संसार उध्वस्त होतात. त्याच दारूतून मिळणाऱ्या अतिरिक्त करातून महिलांचे कल्याण करण्याचे बुडबुडे म्हणजे शासनाला ना दारू दुकाने बंद करावयाची ना महिलांचे कल्याण करावयाचे असे मानणे गैर ठरणार नाही. महाराष्ट्रात गेल्या दोनतीन वर्षांत शेकडो ग्रामपंचायतींनी आणि ग्रामसभांनी आपल्या गावातील दारू दुकाने बंद करण्याचे ठराव करून शासनाकडे पाठविले पण काही तुरळक अपवाद वगळता ही दुकाने बंद करण्याच्या दृष्टीने काहीही हालचाल केली नाही हा अनुभव या दृष्टीने पुरेसा बोलका आहे.

या धोरणाच्या कलम ८.५.१ नुसार शासन 'हिंदू वारसा कायद्यात (१९५६) सुधारणा करून महिलांना जन्मजात हक्क म्हणून मालमत्तेत समान अधिकार' देऊ इच्छिते; तसेच 'पतीच्या मालमत्तेत समान हक्क मिळावा' यादृष्टीने दक्षता घेऊ इच्छिते (कलम ८.४ (अ)) पण पुढे कलम ८.५.२ मध्ये क्रिमिनल प्रोसीजर कोड १२५ मध्ये सुधारणा करण्याचे ठरवून पोटगीसंबंधी न्याय व संरक्षण देण्याची भाषा करून पोटगीसंबंधी खटल्यात स्त्री पक्षकारांना कोर्ट फी माफ करण्याचे औदार्य दाखवते. हा विरोधाभासच नाही का? महिला जर कायद्याने संपत्तीमध्ये समान हक्काची भागीदार होणार असेल तर पोटगीचा प्रश्नच कुठे येतो?

महाराष्ट्र शासनाच्या या महिला धोरणामध्ये महिलांच्या आरोग्यविषयक कार्यक्रमाच्या बाबतीत तर अतिशयोक्तीचा कळसच गाठला आहे. त्यातील कलम १४.४ ची अंमलबजावणी करावयाची म्हटल्यास एवढ्या प्रचंड प्रमाणावर खर्च होईल की त्यामुळे शासनाची सर्व अर्थव्यवस्थाच कोलमडून पडेल.

या कलमाप्रमाणे शासन प्रत्येक विवाहित स्त्रीच्या नावे ती गरोदर राहीपर्यंत दरमहा २५ रुपये म्हणजे वर्षाला ३०० रुपये पोस्टात जमा करेल. २००० लोकवस्तीच्या गावात अशा साधारणपणे १०० महिला असतील तर शासनाच्या तिजोरीवर दर वर्षाला ३०,०००/- रुपयांचा बोजा पढेल. एक जिल्हा ५,००,००० लोकसंख्येचा धरल्यास हा बोजा ७५ लाख रुपयांचा होईल. महाराष्ट्रात एकूण २८ जिल्हे आहेत म्हणजे अख्ख्या महाराष्ट्रासाठी हा खर्च २१ कोटी रुपये होईल. या गणितातून शहरे वगळली आहेत, तीही हिशोबात धरली तर बघायलाच नको. त्यात पुन्हा पहिल्या व दुसऱ्या मुलाच्या अंतरावर या बचत खात्याचे नूतनीकरण करण्याचीही योजना आहे. पाळणा लांबविण्यासाठी प्रोत्साहनपर कार्यक्रमावर एवढा अवाढव्य खर्च म्हणजे मोठा विनोदच आहे.

शासनाच्या या महिला धोरणाचा सांगोपांग अभ्यास करता खात्री पटते की महिला कल्याण वगैरे काही नाही, भपकेबाज कार्यक्रम जाहिर करून पवार सरकार महिलांची व्होट बँक तयार करू पाहात आहे आणि त्या बँकेत आपली पत मिळवू पाहात आहे. ●

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On August 21, 1994

**To**

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
August 21, 1994

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

महिला आघाडी

# संयुक्त अधिवेशन नागपूर

शेतकरी संघटना

## खुले अधिवेशन : १२ नोव्हेंबर १९९४

## सायंकाळी ५ वाजता

शेतकऱ्यांना हजारो वर्षांच्या
आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी
खात्रीशीर प्रयत्न करण्याची संधी देणाऱ्या
**खुल्या व्यवस्थेला** अडथळा आणणाऱ्या
सरकारशाही, नोकरशाही, गुंडगिरी आणि जातीयवादी शक्तींना
निष्प्रभ करण्यासाठी लाखोंच्या संख्येने हजर रहा.

**प्रतिनिधी अधिवेशन :** अधिवेशनाच्या विषय पत्रिकेवर सांगोपांग चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आणि शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीचे पुढील कार्यक्रम ठरविण्यासाठी १०, ११ नोव्हेंबर १९९४ रोजी निमंत्रित कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी अधिवेशन होईल. प्रतिनिधी अधिवेशनाची निमंत्रणे वेगळी पाठविली जातील. सर्व कार्यकर्त्यांनी १२ नोव्हेंबरच्या खुल्या अधिवेशनासाठी जास्तीत जास्त शेतकरी स्त्रीपुरुष पुऱ्या उत्साहाने आणि जोमाने यावेत याची आखणी करावी.

**सौ. सरोज काशीकर**
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी

**पाशा पटेल**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

## कलापथक, वगनाट्य स्पर्धा

शेतकरी संघटनेचा इतिहास आणि कार्यक्रम यांचा प्रचार करण्यासाठी कलापथके, वगनाट्य, सांस्कृतिक (संगीत) कार्यक्रम यांची संयुक्त स्पर्धा शेतकरी संघटनेच्या, नागपूर अधिवेशनानिमित्त आयोजित केली आहे.

***पहिले बक्षिस : दहा हजार रुपये***
***दुसरे बक्षिस : पाच हजार रुपये***
***तिसरे बक्षिस : अडीच हजार रुपये***

या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी स्पर्धेच्या सविस्तर माहितीसाठी

**श्री. मोहन गुंजाळ**
'फिनिक्स', विंचूर रोड,
मु. पो. ता. येवला, जि. नाशिक
यांच्याशी संपर्क साधावा.

कलापथके, वगनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम यांसाठी शब्दसाहित्य तयार करण्यासाठी मार्गदर्शनपर टिपणे श्री. मोहन गुंजाळ यांचेकडून उपलब्ध होतील.

**राम नेवले**
शेतकरी संघटना,
नागपूर अधिवेशन
स्वागत समिती करिता.

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**